

कापड विक्रेत्यांच्या स्थलांतराला मान्यता
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रिअल माद्रिदची क्लब वर्ल्ड कप उपांत्यपूर्व फेरीत धडक
पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ४ जुलै २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 302 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 4 July 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जीएसटीच्या १२ टक्के स्लॅबमध्ये बदलाची शक्यता

**नवी दिल्ली, दि. ३ :** केंद्र सरकारने १२ टक्के जीएसटी स्लॅबमधील वस्तूंचा ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये समावेश करण्याची तयारी चालवल्याची माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सरकार एक सुसंगत आणि सर्वसामान्यांना समजण्याजोगी जीएसटी रचना तयार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे म्हंटले होते.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, सरकार १२ टक्के जीएसटी स्लॅब पूर्णपणे हटवण्याचा किंवा या स्लॅबमधील अनेक वस्तूंना थेट ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये आणण्याचा विचार करत आहे.यामुळे टूथपेस्ट, छत्र्या, शिवणयंत्र, प्रेशर कुकर, भांडी, विजेचे इस्त्री यंत्र, गिझर, लहान वॉशिंग मशिन, सायकली, रेडिमेड कपडे (१००० रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे), चप्पल (५०० ते १००० रुपयांच्या दरम्यानच्या किंमतीच्या), स्टेशनरी, लसी, सिरेमिक टाईल्स, कृषी उपकरणे इत्यादींसारख्या अनेक वस्तू स्वस्त होतील. या निर्णयामुळे सरकारवर ४० हजार ते ५० हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार येईल, असे सुत्रांनी सांगितले आहे. मात्र सरकार हा सुरुवातीचा भार सहन करण्यासाठी तयार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

किंमती कमी झाल्याने खरेदीमध्ये वाढ होईल, परिणामी आर्थिक उलाढाल वाढेल आणि जीएसटी संकलन दीर्घकालीन पातळीवर वाढेल, असा सरकारचा विश्वास आहे. जून २०२५ मध्ये देशातील एकूण जीएसटी संकलन १.८५ लाख कोटी झाले आहे, जे मागच्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ६.२ टक्के जास्त आहे. मात्र, हे संकलन मे (२.०१ लाख कोटी) व एप्रिल (२.३७ लाख कोटी) यांच्यापेक्षा कमी आहे.जीएसटी परिषदेची ५६ वी बैठक या महिन्याच्या अखेरीस होण्याची शक्यता आहे. त्यासाठी किमान १५ दिवसांचा आधी नोटीस देणे बंधनकारक आहे. या बैठकीतच दर बदलावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

### बेदरकार गाडी चालवणाऱ्यांना विमा भरपाई नाही - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, दि. ३ :** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वाहन चालवणाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे जो भविष्यकाळात रस्त्यावरील वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरू शकतो. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की बेफिकीरपणे आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यास विमा कंपनी त्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यास बाध्य नाही.

हा निर्णय एन.एस. रवीश यांच्याशी संबंधित प्रकरणावर आधारित आहे. १८ जून २०१४ रोजी घडलेल्या या दुर्घटनेची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा रवीश हे त्यांच्या वडील, बहीण आणि मुलांसह कारने प्रवास करत होते. मालनहल्लीजवळ त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले आणि भीषण अपघात झाला.

या अपघातामागील कारणे तपासताना असे स्पष्ट झाले की रवीश हे अत्याधिक वेगाने आणि बेपर्वाईने गाडी चालवत होते. त्यांच्या या निष्काळजीपणामुळेच हा अपघात घडला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासणीतही ही बाब स्पष्ट झाली होती. रवीश यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, मुलगा आणि पालकांनी विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. परंतु पोलिसांच्या आरोप पत्रात रवीश यांनाच या अपघातासाठी थेट जबाबदार ठरवण्यात आले होते. या आधारावर मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (एमएसीटी) त्यांचा दावा फेटाळून लावला.

या निर्णयावर असमाधानी असलेल्या कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्यांनी आपला युक्तिवाद बदलत असा दावा केला की अपघात टायर फुटल्यामुळे झाला होता, रवीश यांच्या चुकीमुळे नाही. परंतु उच्च न्यायालयाने या दाव्याला फारसे महत्त्व दिले नाही.

# पावसाचा कहर; जनजीवन विस्कळीत

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३ : गेले दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात बुधवारपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने गुरुवारीही जोर कायम ठेवला. त्यामुळे ग्रामीण भागांसह शहरातील रस्तेही पाण्याखाली गेले. यामुळे अनेक भागातले जनजीवन विस्कळीत झाले आहे. तिसवाडी, बार्देश, पेडणे, डिचोली, सत्तरी, सासष्टी, मुरगाव, सांगे, केपे, फोंडा आणि धारबांदोडा तालुक्यांत पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**

## अनेक रस्ते बंद, संरक्षक भिंती कोसळल्या





## पावसाचा कहर : जनजीवन विस्कळीत







राजधानी पणजीतही गुरुवारी सुरु असलेल्या पावसामुळे प्रमुख रस्त्यांवर पाणी साचले . मेरशी, चिंबल, ताळगाव, रायबंदर, बेती, सांताक्रूझ, बांबोळी या भागांतले रस्तेही पुराच्या पाण्याखाली गेले. रायबंदर येथे राम मंदिराजवळील एका घरासमोरील संरक्षक भिंत कोसळली असून, त्याठिकाणी माती वाहून गेल्याने घराला धोका निर्माण झाला आहे.डिचोली तालुक्यातील सुर्ला येथील जुन्या पंचायतीजवळ झाड कोसळून एक दुचाकीस्वार जखमी झाला आहे. झाड कोसळताना खांबही पडला, मात्र सुदैवाने दुचाकीस्वाराचा जीव वाचला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत त्याला पाळी येथील रुग्णालयात दाखल केले.

मुळगाव, आमोणा व आसपासच्या भागांत घरांचे छप्पर उडाले असून, संरक्षक भिंती कोसळल्याचे प्रकार घडले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी मदतकार्य सुरू ठेवले आहे. डिचोली–पार मार्गावरील वाळवंटी नदीची पातळी वाढल्याने वाहतूक झाली आहे. मुळगाव येथील रस्ता पाण्याखाली गेल्याने उपजिल्हाधिकारी तळावणेकर यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.कुशावती नदीच्या पुरामुळे मडगाव–केपे मार्गावर पाणी साचुन हा मार्ग पूर्णतः बंद झाला आहे. भटवाडी व हरमल येथील मुख्य रस्त्यालगत उभारलेल्या सुरक्षाभिंतींमुळे रस्त्यावरील पाणी अडून तेथील रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

पावसाच्या सततच्या माऱ्यामुळे तिलारी धरणाची पातळी ओसंडून वाहत असून, राज्यातील इतर धरणांमध्येही पाण्याची पातळी वाढली आहे. मानसवाडा आणि चिंबल येथेही संरक्षक भिंती कोसळल्याने घरांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

सावरी आणि नेत्रावळी येथे दरड कोसळल्याचे वृत्त असून, अनेक भागांत अग्निशमन अधिकारी मदतीसाठी धावले आहेत. म्हार्दोळ येथे दोन झाडे घरावर कोसळून घराचे आणि दोन वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

हवामान विभागाने ही स्थिती अतिवृष्टीची असल्याचे जाहीर करत शुक्रवार, ४ जुलै रोजी राज्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. शिक्षण खात्याने याबाबत अधिकृत आदेश काढले आहेत. पूर्वप्राथमिक ते बारावीपर्यंतच्या सर्व शाळा बंद राहणार आहेत.

राज्यातील बहुतांश नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. काही भागांत पंपिंग यंत्रांच्या साहाय्याने पाणी उपसण्याचे काम सुरू आहे. झाडे कोसळून घरांचे व विजेच्या वाहिन्यांचे नुकसान झाल्याचे अनेक घटनांमधून स्पष्ट झाले आहे.

गोवा वेधशाळेने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला असून, नागरिकांनी शक्यतो घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शुक्रवारी देखील पावसाचा जोर कायम राहील, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.




# नंबर प्लेट नसलेल्या दुचाकींची धरपकड

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** मडगाव शहर पोलिसांनी नोंदणी क्रमांक नसलेल्या दुचाकी वाहनांविरोधात मोहीम तीव्र केली आहे.गेल्या काही दिवसांत अशा कायदेशीर ओळख नसलेल्या अनेक दुचाकी वाहनांची जप्ती करण्यात आली आहेवाहतूक शिस्त राखण्याच्या उद्देशाने पोलिसांनी या कारवाईला सुरुवात केली असून, बेकायदेशीर वापराला आळा घालणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.

मडगाव शहराचे पोलिस निरीक्षक सूरज सामंतयांनी माहिती दिली की,नंबर प्लेटशिवाय चालवली जाणारी दुचाकी अडविल्यानंतर, या मोहिमेला गती मिळाली. दुचाकी चालकाकडे कोणतेही स्पष्टीकरण नसल्याचे लक्षात आल्यानंतर, त्या वाहनाचा दावा करणाऱ्या व्यक्तीने ते वाहन तिसऱ्या पक्षाकडून खरेदी केल्याचे सांगितले, मात्र कागदपत्रे सादर करण्यात अपयश आले.

दुसऱ्या घटनेत, मडगावच्या गर्दीच्या बाजारात सोडून दिलेली एक दुचाकी जप्त करण्यात आली असून, अद्याप कोणतीही व्यक्ती ती मागणीसाठी पुढे आलेली नाही, अशी माहिती देण्यात आली.

पोलिसांच्या मते, नोंदणीशिवाय वाहने अनेकदा गुन्हेगारी कारवायांमध्ये वापरली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.जप्त केलेली वाहने केवळ सर्व आवश्यक कागदपत्रांची तपासणी आणि वैध नंबर प्लेट लावल्यावरच परत दिली जातील.हा उपक्रम शहरात कायद्याचे प्रभावी अंमलबजावण सुनिश्चित करण्याचा एक भाग असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलिसांनी वाहनधारकांना आरटीओच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.स्वतःची ओळख स्पष्ट करणाऱ्या वैध नंबर प्लेट्सशिवाय वाहन चालवणे म्हणजे कायदेशीर जोखीम ओढवून घेणे, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

वाहन मालकांनी नोंदणी हस्तांतरण पूर्ण करणे आणि कागदपत्रे नेहमी बरोबर ठेवणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे, अन्यथा वाहन जप्ती आणि दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

# लोटली कोमुनिदादचा विजय सरदेसाईंवर आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** प्रस्तावित बोरि पुलाच्या भूसंपादन प्रक्रियेतून मिळणाऱ्या भरपाईवरून वाद चिघळत असताना, लोटली कोमुनिदादने फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांच्या भूमिकेवर आणि त्यांना भेटणाऱ्या काही नागरिकांवर तीव्र टीका केली आहे.

गुरुवारी संध्याकाळी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात कोमुनिदादने स्पष्ट आरोप केला की, भरपाईसाठी खोटे भाडेपट्टा दावे दाखल केले जात आहेतआणि आमदार तुष्टीकरणाच्या राजकारणात अडकले आहेत.

गेल्या काही दिवसांत आमदार सरदेसाई यांना भेट देणाऱ्या व्यक्तींचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या पार्श्वभूमीवर कोमुनिदादनेया प्रकारांना दिशाभूल करणारे आणि कायदेशीर प्रक्रियेबाहेरचे असे संबोधले.त्यांनी ठामपणे सांगितले की, ज्यांनी स्वतःला भाडेकरू म्हणून सादर केले आहे,

▶ **आमदारांनी तुष्टीकरणारत अडकू नये : भाडेपट्टा दावे फसवे**

त्यांनी यासंदर्भात मामलतदार कार्यालयात कोणतेही अधिकृत दावे दाखल केलेले नाहीत.कोमुनिदादने आरोप केला की हे लोक माध्यमांचा वापर करून सामाजिक सहानुभूती आणि राजकीय दबाव निर्माण करत आहेत.

कोमुनिदादनेआपल्या निवेदनात अल्बर्ट पिन्हेरो यांचे नाव घेत स्पष्ट केला की, ते कोणत्याही कोमुनिदाद जमिनीचे अधिकृत भाडेकरू नाहीत.

पिन्हेरो यांनी २०२१ मध्ये त्यांच्या मावशीच्या मृत्युपत्रावर आधारित भाडेपट्टा दावा दाखल केला होता, पण कोमुनिदादच्या मते, मूळ मृत व्यक्तीच कधीच भाडेकरू नव्हत्या.

कोमुनिदादने पुढे दावा केला की, भूसंपादनाची अधिसूचना जाहीर झाल्यानंतरच काही व्यक्तींनी त्या जमिनींमध्ये पूर्वजांनी लागवड केली होती, असे दाखवण्यासाठी नोंदी मागितल्या.

चानक भाडेकरूपणाचा दावा समोर येणे संशयास्पद आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

कोमुनिदादने हेही निदर्शनास आणले की, त्याच व्यक्तींनी पूर्वी खझान जमिनींच्या संवर्धनासाठी याचिका दाखल केली होती, पण आता आमदारांसोबतच्या बैठकीत तेच लोक भरपाईच्या मागण्या करत आहेत.तसेच काही व्यक्तींनी भातशेती परत मिळवण्याची तयारी दाखवली होती, पण त्याच्या अटीवर 'थेट भरपाई मिळाली पाहिजे' अशी अट घातली होती, असे कोमुनिदादने स्पष्ट केले.

कोमुनिदादने पुनरुच्चार केला की, भाडेपट्टा हक्क फक्त मामलतदार कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्रांवरूनच ठरवले जातात.सार्वजनिक व्यासपीठांवरील आणि माध्यमांतील दाव्यांवर आधार ठेवू नका,असा सल्ला त्यांनी दिला.तसेच, खोटी माहिती पसरवणाऱ्यांवर कारवाई केली जावी, अशी मागणीही त्यांनी अप्रत्यक्षपणे केली.

# अचानक मृत्यूंमागे कोविड लसीचा संबंध नाही – केंद्र सरकार

## हसन जिल्ह्यात एका महिन्यात २२ तरुणांचा मृत्यू | मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा संशय

**नवी दिल्ली, दि. ३ :**

देशभरात तरुणांमध्ये वाढलेल्या अचानक हृदयविकाराच्या झटक्यांमुळे होणाऱ्या मृत्यूच्या घटनांमागे कोविड–१९ लसीकरणाचा थेट संबंध नाही, असा निष्कर्ष केंद्र सरकारने बुधवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केला.भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर ) आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (एनसीडीसी ) यांच्या स्वतंत्र अभ्यासांमध्ये हा निष्कर्ष पुढे आला आहे. तथापि, या निष्कर्षांबाबत वैद्यकीय क्षेत्रात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, कोविड लस सुरक्षित आणि प्रभावी आहे. त्याचे गंभीर दुष्परिणाम अत्यंत कमी प्रमाणात आहेत. तसेच राष्ट्रीय महामारी विज्ञान संस्थेने (एनआयई ) देशातील १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये केलेल्या अभ्यासात देखील लसीकरणामुळे तरुणांमध्ये अचानक मृत्यूचे प्रमाण वाढलेले नाही, असे स्पष्ट झाले आहे.

कर्नाटकातील हसन जिल्ह्यात एका महिन्यात २२ तरुणांचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ट्विटरवरून लसीबाबत संशय व्यक्त केला.ह्या मृत्यूंमागे कोविड लसीमुळे होणारे संभाव्य दुष्परिणाम जबाबदार असू शकतात का ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.त्यांनी आंतरराष्ट्रीय अभ्यासांचा हवाला देत म्हटले की, लसींना घाईघाईने दिलेली मान्यता आणि त्याचे संभाव्य दुष्परिणाम तपासणे गरजेचे आहे.

गेल्या काही वर्षांत भारतात अनेक अचानक मृत्यूच्या घटना समोर आल्या आहेत .कन्नड अभिनेता पुनीत राजकुमार (वय ४६), टीव्ही अभिनेता सिद्धार्थ शुक्ला (४१), विनोदी कलाकार राजू श्रीवास्तव (५९) हे सर्व हृदयविकाराच्या



झटक्याने दगावले.अनेक तरुण व्यायाम करताना, गरबा खेळताना किंवा स्टेजवर नाचताना अचानक कोसळून मृत्यूमुखी पडल्याच्या घटना व्हायरल झाल्या आहेत.या घटनांमध्ये कोविड लसीकरणाचा थेट पुरावा मिळालेला नाही, मात्र डॉक्टर्स दीर्घकालीन कोविड प्रभावांचा इशारा देत आहेत.

सेंट स्टीफन हॉस्पिटलचे डॉ. जेकब पुलियाल यांनी केंद्र सरकारच्या निष्कर्षावर सवाल उपस्थित केला.कोविशिल्ड ही ब्रिटनमधील ॲस्ट्राझेनेकाची लस असून, त्या कंपनीने स्वतः न्यायालयात तिच्या दुष्परिणामांची कबुली दिली आहे, मग आपण यावर चर्चा का टाळतो ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

फाउंडेशन फॉर पीपल–सेंट्रिक हेल्थ सिस्टीम्सचे संचालक डॉ. चंद्रकांत लहरिया यांनी मात्र लसीचे दुष्परिणाम असले तरी ती सार्वजनिक आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.प्रत्येक लसीचे काही प्रमाणात दुष्परिणाम असतात. त्याचे स्वरूप व्यक्तीच्या आनुवंशिक रचनेवर अवलंबून असते. त्यामुळे युरोपात दिसलेले दुष्परिणाम भारतात तितक्याच प्रमाणात दिसतीलच, असे नाही, असे ते म्हणाले.

दुसरीकडे ब्रिटनमध्ये ॲस्ट्राझेनेकाने उच्च न्यायालयात मान्य केले आहे की, त्यांच्या लसीमुळे थ्रोम्बोसिस विथ थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम निर्माण होऊ शकतो.थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम मुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि प्लेटलेट्स घटतात, ज्यामुळे ब्रेन स्ट्रोक किंवा हार्ट ॲटॅक येण्याची शक्यता वाढते.भारतामध्ये हीच लस कोविशिल्ड' या नावाने सीरम इन्स्टिट्यूटने तयार केली होती.

एम्स च्या प्रारंभिक विश्लेषणानुसार, हृदयविकाराचा झटका (मायोकार्डियल इन्फार्क्शन) हेच तरुणांमधील मृत्यूचे मुख्य कारण आहे.अभ्यास पूर्ण झाल्यावर अंतिम निष्कर्ष दिले जातील, असे संस्थेने स्पष्ट केले.एम्सने संभाव्य कारणांमध्ये अनुवंशिक घटकांचा उल्लेख केला आहे.पण दुसरीकडे, युरोपियन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजी आणि ब्रिटिश हार्ट फाउंडेशन यांनी कोविड लसी आणि मायोकार्डिटिस तसेच पेरीकार्डिटिस या स्थितींमधील संबंध मान्य केला आहे.त्यांच्यामते, विशेषतः २५ वर्षांखालील तरुणांमध्ये हा धोका अधिक आहे.ब्रिटनच्या 'ग्रीन बुक ऑन लसी'नुसार, दुसऱ्या डोसदरम्यान या स्थितींचे प्रमाण अधिक आढळले आहे.